धडा पाठ 21

मधुसूदनराव निवृत्त होतात

वामनराव : काय मधुसूदनराव, काय म्हणतेय निवृत्ती? निवृत्त झाल्यावर इथं येऊन तर गेलात पण करमतंय का इथे? की इथे कुठे येऊन पडलो असं वाटतं? नोकरी करावी लागते का अजून?

मधुसूदनराव : नाही. नोकरी संपून गेली खरी पण काम मात्र नोकरीच्या दुप्पट होऊन जातं माझं.

वामनराव : पण तरीही वेळ जाता जाता नसेल ना? माझे काका मला सांगत होते की निवृत्त झाल्यावर फार जड जातं.

मधुसूदनराव : अहो, नोकरीत असताना वेळेवर कामावर जाणं भाग पडायचं. घरातही जबाबदाऱ्या असल्यामुळे वेळेवर घरी यावं लागायचं. आता वेळेचं बंधन गळून पडलं आहे. भरपूर वेळ आणि मनासारखं काम. यामुळे काम भरपूर होऊन जातं. मात्र खूप दमून जातो.

वामनराव : तुम्ही आत्मचरित्र लिहून टाका आता. तुम्ही साहित्यिक आहातच. तुम्ही कविताही लिहिणार होतात की फक्त गद्यलेखनच करणार होतात?

मधुसूदनराव : आत्मचरित्र लिहायला सुरुवात तर करून झाली आहे. बहुतेक पुढच्या मे महिन्यात पूर्ण होऊन गेलेलं असेल.

वामनराव : आणि तुमचा नाटकाचा छंद? तुम्ही तोही पूरा करून घेणार आहात

मघुसूदनराव सेवानिवृत्त हुए

वामनरनाव : क्यों मधुसूदनराव, सेवानिवृत्ति के बाद हालचाल क्या हैं? निवृत्ती के बाद यहाँ आ तो गए आप मगर जी लगता है क्या यहाँ? या इधर कहाँ आ फँसे ऐसा लगता है? क्या अभी भी नौकरी करनी पडती है?

मधुसूदनराव : नौकरी तो खतम हो गई, लेकिन काम तो नौकरी से दुगना हो जाता है मेरा।

वामनराव : पर समय तो काटे नहीं कटता होगा? मेरे चाचा मुझे बता रहे थे कि निवृत्ति के बाद बहुत मुष्कील होता है।

मधुसूदनराव : नौकरी में था, तो समयपर काम की जगह पर पहुँचना पड़ता था। घर की जिम्मेदारियों की वजह से घर भी समय से आना पड़ता था। अब तो समय का बंधन नहीं रहा है। समय भरपूर (है) और मनपसंद काम इसलिए खूब काम हो जाता है। मगर थक जाता हूँ।

वामनराव : आप अभी आत्मकथा लिख डालिए। आप साहित्यकार तो हैं हि। आप कविता भी लिखने वाले थे या सिर्फ गद्यलेखन ही करनेवाले थे?

मधुसूदनराव : मैं ने आत्मकथा लिखना शुरू किया है। प्रायः अगली मई तर पूरी हो चुकी होगी।

का?

मधुसूदनराव : हो त्यातच तर माझा खूप वेळ निघून जातो. मुलांची नाटकं बसवतो. त्यासाठी मुलांना एकत्र जमवावं लागतं त्यांच्या पालकांची परवानगी मिळवावी लागते. त्यात खूप आनंदही मिळतो आणि जनसंपर्कही घडून जातो.

वामनराव : पण वहिनी काय म्हणताहेत? त्या मजेत आहेत की नाराज आहेत?

मधुसूदनराव : तीही खुश आहे. पूर्वी तिला लवकर उठावं लागायचं. धांदल उडायची तिची! आता मी थोडंफार घरचं सांभाळतो. तिला मदत करतो. तिला जरा विश्रांती मिळून जाते. चार वर्षांनी तीही निवृत्त होणार आहे. तेव्हा मी नि ती दोघं मिळून काम करू. इतकी वर्ष दोघांनाही काम करावं लागत होतं, ते पोटासाठी. आताही करू काम. पण स्वतःसाठी! स्वतःच्या आनंदासाठी! ही कल्पनाच सुखावणारी आहे. मग आयुष्यच निराळं असेल. दोघंही मुक्त. दोघंही तृप्त! बा.भ. बोरकरांनी म्हटलंच आहे नं की अमृतघट भरले तुझ्या घरी, मग तू का वणवण फिरशी बाजारी?

वामनराव : और आपका नाटक का शौक? आप वह भी पूरा करनेवाले हैं क्या?

मधुसूदनराव : जी,हाँ। उसी में मेरा काफी समय चला जाता है। अपने निर्देशन में बच्चों से नाटक करवाता हूँ। उसके लिए बच्चों को इकट्ठा करना पड़ता है। उन के माता-पिता की अनुमति लेनी पड़ती है। उस में बहुत आनंद भी मिलता है और जन संपर्क भी हो जाता है।

वामनराव : लेकिन भाभीजी क्या कहती हैं? खुश हैं या नाराज हैं?

मधुसूदनराव : वें भी खुश हैं। पहले तो उन्हें जल्दी उठना पड़ता था। हड़-बड़ी में रहती थीं। अब मैं घर का थोड़ा बहुत काम संभालता हूँ। उनकी मदद करता हूँ। उन्हे थोड़ा आराम मिल जाता है। चार वर्षों के बाद वे भी सेवानिवृत्त होनेवाली हैं। तब मैं और वें हम दोनों साथ काम करेंगे। इतने बरस काम करना पडा था वह पेट की खातिर। अब भी काम करेंगे पर खुद के लिए। अपने आनंद के लिए। इसकी कल्पना मात्र से मुझे सुख मिलता है। उस के बाद, जीवन ही निराला होगा। दोनों ही मुक्त दोनों ही तृप्त! बा.भ. बोरकरजी ने कहा ही है न कि तुम्हारे घर अमृत के घड भरे हैं, तब तू क्यों बाजार में मारा मारा फिरता है?

शब्दार्थ

इथं कुठे येऊन पडलो	इधर कहाँ आ फँसा?
वाटणे	चाहना
नोकरी	नौकरी
पण	लेकिन

दुप्पट	दुगना
वेळ जाता जात नाही	समय काटे नही कटता
वेळेवर	समयपर
भाग पडणे	कोई भी बात सख्ती से करना पडना है
जबाबदाऱ्या	जिम्मेदारियाँ
यायला लागायचं	आना पडता था
थकून जातो	थक जाता हूँ
आत्मचरित्र	आत्मकथा
सुरवात करणे	शुरू करना
छंद	शौक
खूप	भरपूर
नाटक बसवणे	नाटक (निर्देशित) करना
परवानगी	अनुमति
लवकर	जल्दी
धांदल	हड़-बड़ी
थोडंफार	थोडा बहुत
इतकी	इतनी
स्वतःसाठी	खुद के लिए
निराले	निराला
तृप्त	तृप्त

अभ्यास

I खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

1) नोकरीत असताना मधुसूदनरावांना काय करावे लागे?
2) निवृत्तीनंतरच्या काळात मधुसूदनराव काय करणार होते?
3) मधुसूदनरावांचे आत्मचरित्र कधी पूर्ण झालेलं असेल?
4) मधुसूदनराव हल्ली नाटकासंबंधी काय करतात?
5) मधुसूदनरावाच्या नोकरीच्या काळात त्यांच्या पत्नीला काय करावे लागे?
6) पत्नीच्या निवृत्तीनंतर मधुसूदनरावांचा काय बेत आहे?

II धडा वाचून त्यानुसार वाक्ये पूर्ण करा.

1) नोकरी .... गेली खरी पण काम मात्र नोकरीच्या दुप्पट ....
2) घरातही .... असल्यामुळे .... घरी .... लागायचं.
3) आता वेळेचं बंधन .... पडलं आहे.
4) मुलांची .... बसवतो.
5) मी थोडंफार .... सांभाळतो तिला जरा विश्रांती ....

III कंसात दिलेल्या क्रियापदांच्या योग्य रूपांचा उपयोग करून वाक्ये पूर्ण करा.

1) तू पटकन गृहपाठ .... (कर, टाक) मग खेळायला जा.
2) तू त्याच्याकडे ...., (जा, ये) तो तुला नीट मार्गदर्शन करील.
3) माझ्याकडून फार मोठी चूक .... (हो, जा) आता मला प्रायश्चित्त करायला हवं.
4) आपण कुठे जंगलात .... (ये, पड) असं त्याला वाटलं.
5) मी पुरणपोळीची चव .... (घे, चुक)

IV कंसातून योग्य शब्द निवडून वाक्ये पूर्ण करा.

1) लोकमान्य टिळकांनी घोषणा दिली .... "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे". (म्हणून, कारण, की)
2) सिनेमाला जाणार आहेस .... नाटकाला? (पण, की, तरी)
3) मी इतकी थकून गेले होते .... मला ते काम करावंच लागलं. (जरी, तरी, आणि)
4) तो आला .... एकदम जेवायला बसला. (कारण, तरी, आणि)
5) त्यानं उशिरा येण्याचं असं काही कारण सांगितलं .... मला त्याला माफ करावंच लागलं. (असून, पण, की)

V उदाहरणानुसार वाक्ये पूर्ण करा.

1. *उदाहरण:* मी अभ्यास <u>करणार</u> <u>होतो</u> पण दिवे गेले.

1) मी नाटकाला .... पण ऐनवेळी पाहुणे आले.
2) आम्ही नाटक .... पण मुलांना सुट्टी नव्हती.
3) सुमन भाजी .... पण तिच्याजवळ पैसे नव्हते.
4) शांताबाई पत्र .... पण त्यांना पेन सापडलं नाही.
5) रमेश माझ्याबरोबरच जेवायला .... पण एवढ्यात त्याचे मित्र आले.
6) रामभाऊ नोकरी .... पण ते आजारी पडले.
7) मुली गढवालला .... पण त्यांची परीक्षा होती.

2. *उदाहरण:* मी रजा <u>घेणार नव्हतो</u> पण ताप उतरला नाही.

1) मी नाटकाला .... पण सगळ्यांनी खूप आग्रह केला.
2) आम्ही काम .... पण आम्हाला ते करावंच लागलं.
3) तू तिला पैसे .... ना? मग का दिलेस?
4) तुम्ही गावाला .... ना? मग कसे गेलात?
5) रामभाऊ भाषण .... पण त्यांना ते द्यावंच लागलं.
6) राम गढवालला .... ना? मग का गेला?

VI उदाहरणानुसार कंसात दिलेल्या शब्दाच्या योग्यरूपाचा 'अस' क्रियापदाच्या योग्य रूपा बरोबर उपयोग करून वाक्ये पूर्ण करा.

उदाहरण: मी गावाला गेलो असेन.

1) तू गावाला गेली होतीस ना? खूप मजा .... (कर).
2) मी ते लिहून .... (संपव)
3) मी घंटा ऐकली नाही मी .... (झोप)
4) सीतानं आधीच अभ्यास .... (कर)
5) रामनं मांजराला .... (मार)
6) तुम्ही कुत्र्याला दूध .... (दे)
7) राम त्यावेळी शाळेत .... (जा)
8) आम्ही त्यावेळी बागेत .... (बस)

VII उदाहरणानुसार वाक्ये पूर्ण करा.

उदाहरण: मी चित्र काढत असेन.

1) परीक्षेसाठी रमा खूप अभ्यास ....
2) तू दूपारी आराम ....
3) तुम्ही आज दिवसभर स्वयंपाक ....
4) रमेश आता पुस्तक ....
5) आम्ही सिनेमा ....

VIII कंसात दिलेल्या शब्दाच्या योग्य रूपाचा उदाहरणानुसार उपयोग करून वाक्ये पूर्ण करा.

उदाहरण: मी उद्या बहुतेक गावाला जाणार असेन.

1) तो उद्या मुंबईला .... (जा)
2) रमा दिवाळीसाठी साडी .... (घे)
3) तू दिवसभर .... ना? उद्या सुट्टी आहे. (झोप)
4) तुम्ही नाटकात काम .... ना? (कर)
5) आम्ही निवृत्तीनंतर गावी स्थायिक .... (हो)
6) अहमद ईदसाठी नवे कपडे .... (घे)

IX कंसात दिलेल्या शब्दांतून योग्य तो शब्द निवडून वाक्ये पूर्ण करा.

1) प्रकाश उद्या मुंबईला .... असेल. (जातो, जाणार, गेलास)
2) सुनंदाने बाबांना पत्र .... असेल. (लिहीत, लिहिणार, लिहिले)
3) बाबा आता फिरायला .... असतील. (जाते, जात, गेला)
4) आतापर्यंत रमाबाई निवृत्त .... असतील. (झाला, होत, झाल्या)
5) काल तू धबधब्याखाली आंघोळ .... असशील. (करतोस, केली, करणार)

X खाली दिलेल्या दोन भागांतील शब्दसमूह घेऊन योग्य जोड्या बनवा.

रामू शाळेत	लिहिणार होतो.
मी आत्मचरित्र	करणार होती.
रमा स्वयंपाक	पाहणार होते.
आम्ही गावाहून	आणणार होत्या.
आईसाहेब आंबे	करणार होतास.
रामभाऊ नाटक	सांगणार होता.
तू नाटकात काम	येणार होतो.
तुम्ही गोष्ट	येणार होता.

XI उदाहरणानुसार वाक्ये पूर्ण करा.

उदाहरण:	तो शाळेत जात असेल.	तो शाळेत गेला असेल.
1)	मी शाळेत	मी शाळेत ....
2)	आम्ही शाळेत	आम्ही शाळेत ....
3)	रमा शाळेत	रमा शाळेत ....
4)	तू शाळेत	तू शाळेत ....
5)	तुम्ही शाळेत	तुम्ही शाळेत ....

XII खालील वाक्ये नकारार्थी करा.

1) मी गावाला गेलो असेन.
2) ती गावाला गेली असेल.
3) तो गावाला जात असेल.
4) आम्ही गावाला जात असू.
5) तू गावाला जाणार असशील.
6) त्या गावाला जाणार असतील.
7) तुम्ही गावाला जाणार असाल.
8) आपण गावाला जात असाल.

XIII कंसांत दिलेल्या क्रियापदांच्या योग्य रूपांबरोबर 'अस' क्रियापदाचे योग्य रूप वापरून खालील परिच्छेद पूर्ण करा.

एव्हाना मधुकरराव निवृत .... (हो). ते आता आराम .... (कर). एखादं पुस्तक लिहायला .... (घे). कविता .... (कर). आणखी एका वर्षाने रमाबाईही निवृत्त .... (हो). त्यानंतर ती दोघंही खूप प्रवास .... (कर). नातवंडाना .... (खेळ). आयुष्यभर त्यांनी खूप कष्ट .... (कर). उर्वरित आयुष्यात त्यांना विश्रांती .... (मिळ).

पढिए और समझिए

निवृत्ती

चार वर्षांपूर्वी मी निवृत्त झालो. त्यावेळी माझ्या वयाला अट्ठावन्न वर्षे पूर्ण झ ाली. खरं म्हणजे त्याहीपूर्वी तीन वर्षे मला निवृत्त व्हावे लागले असते. कारण सरकारने निवृत्तीचे वय पंचावन्न ठरवले होते. माझे दैव बलवत्तर होते. मला पंचावन्न वर्षे पूर्ण होणार होती त्याच्याआधी दोनच महिने सरकारने निवृत्तीवयाची मर्यादा वाढवली. परत अट्ठावन्न वर्षे केली. नवा नियम आल्यामुळे मला फायदा झाला. यापूर्वीच मी निवृत्तीनंतर काय करणार, कसे जीवन जगणार, खर्चावर कसे नियंत्रण ठेवणार याचा विचार केला होता. घराची डागडुजी करणे भाग होते. मुलीचे लग्न करणे भाग होते. यासाठी पैसे लागणार होते. त्यासाठी नोकरी शोधणार होतो. पण अचानक नोकरीचे वय वाढल्यामुळे मला सर्व बेत बदलावे लागले. मी या अचानक मिळालेल्या तीन वर्षांचा फायदा घेतला. पंचावन्नाव्या वर्षीच आपण निवृत्त झालो आहोत असे मी मानून टाकले. निवृत्तीवेतना इतक्याच पैशात खर्च भागवू लागलो. त्यामुळे खूप पैसे जमून गेले. पैसे जमवल्यामुळे घराची डागडुजी केली. मुलीचे लग्न करून टाकले. त्यामुळे निवृत्तीनंतर नोकरी करावी लागली नाही.

आता जे काम करतो ते फक्त स्वतःच्या आनंदासाठी! लहान मुलांची नाटकं बसवतो, बागकाम करतो, प्रवास करतो, खूप लिहीतो. या सगळ्यात समाधान मिळते. त्यामुळे कसलंही दडपण येत नाही. आज मी कृतार्थ जीवन जगत आहे. आता त्याचे बोलावणे येणार असेल तेव्हा येवो. मी कोणत्याही क्षणी तयार आहे.

शब्दार्थ

चार वर्षांपूर्वी	चार साल पहले
त्यावेळी	उस समय
अट्ठावन्न	अट्ठावन
खरं म्हणजे	सच कहें तो
त्याहीपूर्वी	उस से भी पहले
व्हावे लागले असते	होना पड़ता था
पंचावन्न	पचपन
दैव	भाग्य
बलवत्तर	जोरदार
मर्यादा	अवधि, सीमा
जगणे	जीना
नियंत्रण	रोक
घराची डागडुजी	घर की मरम्मत
वाढणे	बढ़ जाना
बेत	योजना

बदलणे	बदलना
अचानक	अचानक
मानणे	मानना,
भागवणे	निभाना, चलाना (खर्च)
दडपण	बोझ
त्याचं	उस का (भगवान का)
बोलावणं	निमंत्रण, बुलावा

अभ्यास

I खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.

1) चार वर्षांपूर्वी माझ्या वयाला किती वर्षे पूर्ण झाली?
2) खरे म्हणजे मला कितव्या वर्षी निवृत्त व्हावे लागले असते?
3) निवृत्ती वयाची मर्यादा किती वर्षांनी वाढली?
4) अचानक नोकरी वाढल्यामुळे प्रथम मला काय करावे लागले?
5) अचानक पैसे मिळल्याने मला काय करता आले?

II रेखांकित शब्दाच्या जागी कंसात दिलेले शब्द भरून वाक्ये पूर्ण करा. जरूर तेथे वाक्यरचनेत आवश्यक तो बदल करा.
(आयुष्य, पूर्वी, विश्रांती, अजिबात, दुरुस्ती, अलिकडे, निर्बंध)

1) आता वेळेचं मुळीच बंधन नाही.
2) तिला आताशा जरा आराम मिळतो.
3) त्याच्या आधीच मी निवृत्त झालो.
4) घराची डागडुजी केली.

III 'दमणे' पासून 'दमणूक' हा शब्द बनतो.
उदाहरण: मी दमते. माझी दमणूक होते.
याच प्रकारे खाली दिलेल्या शब्दांवरून दुसरे शब्द बनवा.
करमणे, वागणे, फसवणे

IV 'निवृत्त' वरून 'निवृत्ती' शब्द बनतो.
मधुसूदनराव निवृत्त होतात.
निवृत्तीनंतर मधुसूदनराव सुखी आहेत.
याच प्रकारे खाली दिलेल्या शब्दांपासून दुसरे शब्द बनवा.
तृप्त, मुक्त, श्रीमंत, गरीब

V 1) या धड्यात असे अनेक शब्द आले आहेत जे मराठी व हिंदीत समान आहेत.

उदाहरण: काम, भरपूर, आराम, निवृत्ती. (हिंदी मध्ये "निवृत्ति") आतापर्यंत शिकलेल्या धड्यांमधून आलेले असे वीस शब्द शोधा आणि लिहा.

2) त्या प्रमाणे, नोकरी, निराळा, खूप, सुरू हे असे शब्द आहेत की त्यांचा अर्थ दोन्ही भाषांत एकसारखाच आहे पण लिहिण्याच्या पद्धतीत थोडासा फरक आहे. अशा प्रकारचे वीस शब्द लिहा.

VI खाली दिलेल्या शब्दांचे दोन अर्थ होतात. ते समजून घ्या. आतापर्यंत वाचलेल्या धड्यांमधून असे आणखी शब्द शोधा आणि लिहा.

1) ओढणे - खलनायक नायिकेला ओढतो.
म्हातारा गुडगुडी ओढतो.

2) भाग पडणे - घराचे तीन भाग पडले.
मला लग्न करणे भाग पडले.

3) बसवणे - त्याने सर्वांना खाली बसवले.
त्याने लहान मुलांचे नाटक बसवले.

VII खाली दिलेल्या शब्दांपासून वाक्ये बनवा.
निवृत्ती, दुप्पट, जबाबदारी, भरपूर, बंधन, दमणूक

VIII हिंदीमध्ये भाषांतर करा व समर्पक शीर्षक द्या.

सेवानिवृत्त होणे ही माणसाच्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना असते. काही लोक सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याचा मजेनं उपभोग घेताना दिसतात. माणसाला मनापासून जे काम आवडतं, ते काम करण्याचं स्वातंत्र्य त्याला निवृत्तीनंतर मिळतं. तो आपल्या आवडत्या कलांचा उपभोग घेऊ शकतो. गाण्याच्या, नाटकांच्या हव्या त्या कार्यक्रमांना जाऊ शकतो, हवं तेव्हा वाचनालयात जाऊ शकतो व हवी ती पुस्तकं वाटेल तेवढा वेळ वाचण्याचा आनंद लुटू शकतो. वेळेचं बंधन त्याला नसतं. आतापर्यंतच्या धकाधकीच्या आयुष्यात त्याच्या अंगातल्या कलागुणांच्या विकासाला हवा तसा वाव मिळालेला नसतो. पण आता कामाची सक्ती संपून गेलेली असते. आता त्या कलागुणांकडे तो लक्ष देऊ शकतो. गाणं शिकू शकतो. चित्रं काढू शकतो. नाटकं दिग्दर्शित करू शकतो नि नाटकात कामही करू शकतो.

इतके दिवस पोटापाण्यासाठी नोकरी करताना आपल्या पत्नीकडे, मुलाबाळांकडे लक्ष द्यायला त्याला वेळ मिळालेला नसतो. आता रिटायरमेंट नंतर तो त्यांच्या बरोबर हवा तेवढा वेळ घालवायला मोकळा असतो. आता तो बायकोबरोबर फिरायला जाऊ शकतो नि हॉटेलातही जाऊ शकतो; प्रेक्षणीय स्थळांनाही जाऊ शकतो आणि सहलींनापण. दोघेही रसिकपणाने जीवनाच्या क्षणाक्षणाचा इतका आस्वाद घेऊ शकतात की मन तृप्त व्हावं.

मात्र हे करण्यासाठी निवृत्तीनंतरच्या आयुष्याबद्दल निवृत्तीपूर्वीच नीट तयारी करायाला हवी. ही तयारी अनेक प्रकारची असते. निवृत्तीनंतरच्या आरामासाठी

निवृत्तीआधीच पुरेसं आर्थिक बळ उभं करायला हवं असतं. मनाचीही खूप तयारी आधीपासूनच करावी लागते. नाहीतर निवृत्तीनंतरचं आयुष्य बेचव होऊन जातं.

IX मराठी में अनुवाद कीजिए।

कुछ लोग निवृत्ति के पश्चात् हड़बड़ी भूलकर आराम की जिंदगी जीना चाहते हैं। कुछ लोग निवृत्ति के बाद अपने कुटुंब के सदस्यों के और नातियों पोतियों के साथ समय बिताना चाहते हैं।

कुछ समाज सेवा करना चाहते हैं। उस में भी कुछ लोग किसी समाज सेवी संस्था से जुड़कर समाज सेवा करना चाहते हैं। कुछ लोग अपने निजी स्तरपर ही समाज सेवा के कार्य में जुड़ जाते हैं। लेकिन मेरी योजना (इससे) भिन्न है। मैं बच्चों का स्कूल खोलना चाहता हूँ जहाँ बच्चे आराम से छुट्टियाँ बिताएँगे। 5 से 16 साल तक के बच्चे यहाँ आकर पुस्तकें और मैगज़ीन (पत्र-पत्रिकाएँ) पढ़ सकेंगे। मैं भिन्न-भिन्न आयु-वर्ग के बच्चों के उपयुक्त, उनका रुचि के अनुसार, पुस्तकें खरीदूँगी। ये आयुवर्ग 5 से 8 साल, 9 से 12 साल तथा 13 से 16 साल के हो सकते हैं। बच्चे अपनी निजी पुस्तकें भी ला सकेंगे। पहले वर्ग (5 से साल तक) के बच्चों के माँ-बाप भी इस वाचन-पाठशाला अपने बच्चों के साथ आ सकेंगे। वे अपने बच्चों के साथ बैठकर उनकी रुचि की पुस्तकें पढ़ कर सुना सकेंगे और दूसरे बच्चों की सहायता भी कर सकेंगे। इस स्कूल में 'ऊँची आवाज़ में पढ़ने के सत्र' भी होंगे। अधिक आयु के बच्चे अल्पवयस्क बच्चों को कहानियाँ, कविताएँ सुनाया करेंगे और उनके साथ भाषा पर आधारित खेले, जैसे 'पहेलियाँ', 'बुझौडल', 'नटखट प्रश्नोत्तर', खेलेंगे। समाचार पत्र पढ़ने के भी अलग सत्र होंगे। मेरी कल्पना है कि मेरा 'पाठ-नुक्कड़' बच्चों के लिए 'पढ़ो और जानो', 'पढ़ो और बढ़ो' और 'पढ़ो और खेलो' वाला स्थान होगा।

टिप्पणियाँ

I नीचे दिए गए वाक्यों में क्रिया के रेखांकित रूपों पर ध्यान दीजिए।

1)	निवृत्त झाल्यावर इथं <u>येऊन तर गेलात.</u>	निवृत्ती के बाद यहाँ आ तो गए।
2)	मी कुठे <u>येऊन पडलो</u>?	मैं कहाँ आ पडा?
3)	नोकरी <u>संपून गेली.</u>	नौकरी खतम हो गई।
4)	काम मात्र नोकरीच्या दुप्पट होऊन जातं.	बल्कि काम नौकरी से दुगना हो जाता है।
5)	मी खूप <u>दमून जातो</u>.	मैं बहुत थक जाता (हूँ)।
6)	तुम्ही आत्मचरित्र <u>लिहून टाका</u>.	आम आत्मकथा लिख डालिए।
7)	जनसंपर्क <u>घडून जातो</u>.	जनसंपर्क हो जाता है।
8)	तुम्ही नाटकाचा छंद पूरा <u>करून घेणार</u>.	आप नाटक की शौक पूरा करनेवाले होंगे।

इन वाक्यों में दो क्रियारूपों का प्रयोग है। एक क्रिया दूसरे का सहायक है। सहायक क्रियाओं को जोडने से प्रधान क्रिया के अर्थ में बहुत सी अर्थछवियाँ जुड जाती हैं। हिंदी में सहायक क्रियारूप क्रिया के मूल रूप में जोडी जाती है और मराठी में उसे पूर्व कालिक कृदंत के साथ जोडते हैं। "लिहून टाका", इस क्रियारूप में लिहून, यह पूर्वकालिक कृदंत है तथा "टाका" यह सहायक क्रिया का रूप। "लिहून टाका" इन शब्द समूह को संयुक्त क्रियापद कहते हैं। ध्यान दीजिए कि इस पूरे शब्दसमूहद्वारा एकही क्रिया का बोध होता है। मुख्य क्रिया का बोध पूर्वकालिक कृदंत से होता है, मगर वाक्य को पूर्णता सहायक क्रियापद से आती है। "येऊन पडलो" में सहायक क्रिया का प्रयोग कार्य की अनिवार्यता का बोध कराता है। कभी कभी वक्ता की राय में क्रिया का फल सुखद नही होता।

"काम नोकरीच्या दुप्पट होऊन जातं" "नोकरी संपून गेली" आदि में स्वेच्छा के बिना किए गए कार्य का बोध किया जाता है। "मी पुरणपोळीची चव घेऊन चुकले आहे" "इस वाक्य में कार्य का कर्ता के लिए पूर्ण हो जाने का बोध है।

"मी कविता लिहून टाकली" प्रयोग कार्य का कर्ता के लिए पूर्ण हो जाने का तथा कर्ता के कार्य की जिम्मेदारी से मुक्ति पानेका अर्थ व्यक्त करता है।

II नीचे दिए गए प्रयोगों को देखिए।

1)	इथं करमतं का <u>की</u> इथे कुठे येऊन पडलो असं वाटतं.	यहाँ जी लगता है क्या? <u>या</u> लगता है यहाँ कहाँ आ फँसे?
2)	तुम्ही कविताही लिहिणार आहात <u>की</u> फक्त गद्यलेखनच करणार?	आप कविता भी लिखनेवाले हैं <u>या</u> केवल गद्यलेखन ही करेंगे?

इन प्रयोगों में "की" हिंदी के "या" के अर्थ में प्रयुक्त किया गया है। इस को <u>विकल्पबोधक</u> कहते हैं। दो वाक्यों के या दो शब्दों के बीच इसका प्रयोग होता है।

III नीचे दिए गए प्रयोगों की ओर ध्यान दीजिए।

1)	माझे काका मला सांगत होते <u>की</u> निवृत्त झाल्यावर फार जड जातं.	मेरे चाचा मुझे बता रहे थे कि निवृत्ती के बाद मुष्कील होता है।

2) बा.भ.बोरकरांनी म्हटलंच आहे नं की अमृतघट भरले तुझ्या घरी, मग तू का वणवण फिरशी बाजारी.

इन वाक्यों में "की" अव्यय का प्रयोग हिंदी के "कि" के अर्थ में किया है। इस अव्यय 'की' का प्रयोग किसी व्यक्ति का कथन, सोच, भावना, अनुभव आदि को उद्धृत करना है। उस के पहले/बाद में वक्ता का उल्लेख होता है।

IV "तो इतका खेळला की त्याचे पाय दुखू लगले" इस वाक्य में "की" का प्रयोग परिणाम बोधक अर्थ में किया गया है।

V "माझा पहिला नंबर आला <u>की</u> मी पेढे वाटीन" इस वाक्य में "की" का प्रयोग शर्त बोधक अर्थ में हुआ है।
मेरा पहिला नंबर आएगा, <u>तो</u> मैं पेडे बाँटूंगी।

VI निम्न प्रयोगों को देखिए।

नोकर संपून गेली <u>पण</u> काम मात्र दुप्पट होऊन जातं माझं.	नौकरी खतम हो गई, लेकिन काम दुगना हो जाता है मेरा।
"<u>पण</u> वहिनी काय म्हणताहेत?	पर भाभी (जी) कैसी हैं?
<u>पण</u> वेळ जात नसेल नं?	<u>लेकिन</u> समय काटे नही कटता होगा न?
<u>आणि</u> तुमच्या नाटकाचा छंद?	और आप का नाटक का शौक?

मराठी में 'पण', 'व' आणि 'नि' ये उभयान्वयी अव्यय शब्द हैं जो दो वाक्यों को या दो शब्दों को जोडते हैं। "आणि" 'व', और 'नि' का अर्थ है 'और'। 'पण' का अर्थ है 'मगर' - 'लेकिन'।

VII 1. नीचे दिए गए वाक्य प्रयोगों की ओर ध्यान दीजिए।

तुम्ही/तो ही (नाटकाचा छंद) पूरा करून <u>घेणार</u> असाल.	आप वह भी (नाटक का शौक) पूरा करनेवाले होंगे।
चार वर्षानी तीही निवृत्त <u>होणार</u> आहे.	चार सालों के बाद वह भी निवृत्त होनेवाली है।

जानेवाला था, होने को था - इस प्रकार के वाक्य बनाने के लिए मराठी में क्रिया में 'णार' प्रत्यय लगाकर उस के बाद 'हो' के उपयुक्त रूप का प्रयोग करते हैं. इसकी भूतकालिक रूपावली नीचे दी गई है।

जा

		एकवचन	*बहुवचन*
उ.पु.	*(पु.)*	मी जाणार होतो. मैं जानेवाला था।	आम्ही जाणार होतो. हम जानेवाले थे।
	(स्त्री.)	मी जाणार होते. मैं जानेवाली थी।	आपण जाणार होतो. हम जानेवाली थीं।
म.पु.	*(पु.)*	तू जाणार होतास. तुम जानेवाले थे।	तुम्ही / आपण जाणार होता. आप जाने वाले थे।
	(स्त्री.)	तू जाणार होतीस. तुम जानेवाली थीं।	
अ.पु.	*(पु.)*	तो जाणार होता. वह जानेवाला था।	ते जाणार होते. वे जाने वाले थे।
	(स्त्री.)	ती जाणार होती.	त्या जाणार होत्या.

		वह जानेवाली थी।		वे जाने वाली थीं।
	(नपुं.)	ते जाणार होतं.		ती जाणार होती.

2. इन वाक्यों का निषेध वाचक रूप बनाने के लिए 'णार' के बाद 'नव्हता' (ना होता का मिला हुआ रूप) के रूप लगाते हैं।

इस की भी पूरी रूपावली नीचे दी गई है।

नव्हता

		एकवचन	*बहुवचन*	
उ.पु.	*(पु.)*	मी जाणार नव्हतो. मैं नहीं जाने वाला था।	आम्ही / आपण	जाणार नव्हतो. हम नहीं जानेवाले थे।
	(स्त्री.)	मी जाणार नव्हते. मैं नहीं जानेवाली थी।		हम नहीं जानेवाली थीं।
म.पु.	*(पु.)*	तू जाणार नव्हतास. तू/तुम नहीं जानेवाले थे।	तुम्ही / आपण	जाणार नव्हता. आप नहीं जानेवाले थे।
	(स्त्री.)	तू जाणार नव्हतीस. तुम नहीं जानेवाली थीं।		आप नहीं जानेवाली थीं।
अ.पु.	*(पु.)*	तो जाणार नव्हता. वह नहीं जानेवाला था।		ते जाणार नव्हते. वे नहीं जानेवाले थे।
	(स्त्री.)	ती जाणार नव्हती. वह नहीं जानेवाली थी।		त्या जाणार नव्हत्या. वे नहीं जानेवाली थी।
	(नपुं.)	ते जाणार नव्हतं.	ती जाणार नव्हती.	